# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५**

## अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एम-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०८, अन्न साठवण व वखार**<br>**रूपये:- ७,४०,६२,८३,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१) | ६२१ | १०० | वडगावशेरी मतदारसंघात (परिमंडळ ई) विभागात प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे १,०८,००० इतके लाभार्थी असणे, वडगावशेरी मतदारसंघाला मिळालेला इष्टांक १०० टक्के पूर्ण झालेला आहे. तथापी वडगावशेरी मतदारसंघात लक्ष्मीनगर, गांधीनगर, भाट वस्ती, वडारवस्ती, भीमनगर, येरवडा, यमुनानगर या भागात मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वसाहत असून सदर भागामध्ये हातावर पोट असणारे, मजुरी करणारे गोरगरीब नागरिक वास्तव्यास असणे, तसेच मतदारसंघात विश्रांतवाडी, लोहगाव, खराडी हे नव्याने विकसित होत असलेले भाग असून सदर भागामध्ये स्थलांतरीत मजुराचे प्रमाण अधिक असणे, तसेच वडगावशेरी मतदारसंघाची लोकसंख्या सुमारे ७ लाख इतकी असणे, मात्र प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा इष्टांक फक्त १,०८,००० एवढाच असून सदर योजनेचा लाभ मिळत नसलेला परंतु पात्र होणाऱ्या नागरिकांची मागणी मोठ्या प्रमाणात असणे, त्याबाबत नागरिक सातत्याने मागणी करीत असणे, परंतु इष्टांक पूर्ण झालेला असल्याने वाढीव लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला न जाणे, पर्यायाने गोर-गरीब नागरिक सदर योजने पासून वंचित राहणे, सबब सर्व बाबींचा विचार करून वडगावशेरी मतदार संघ (परिमंडळ ई) विभागास प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा किमान ५०,००० इतका वाढीव इष्टांक मंजूर करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (२) | २९३ | १०० | अंजनगाव तहसील कार्यालय येथील राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यानुसार सुधारित उपलब्ध करून दिलेला इस्टांक पूर्तता करण्यात आली असणे, त्यानंतर माहे जून २०२४ ते डिसेंबर २०२४ धान्य न उचल करणाऱ्या अपात्र शिधापत्रिका यासंबंधी कार्यवाही करून काही शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या व काहीचे कार्ड प्रकार बदलण्यात आलेले असणे, त्यामुळे अंजनगाव तालुक्यात इस्टांक रिक्त झालेला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असणे, आज रोजी अंत्योदय अन्न योजनेचा २७ शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब लाभार्थी ६१० व्यक्ती संख्या रिक्त असणे, कॅपिंग हे जिल्हास्तरासाठी असल्याने काही तालुक्यात अधिक इष्टांक पूर्तता केली जात असणे, त्यामुळे इतर तालुक्यांना इष्टांक पूर्तता करताना कॅपिंग संबंधी समस्या उद्भवतात तसेच येथे सदर इष्टिकांची पूर्तता करताना ऑनलाईन प्रणाली वर कॅपिग संबंधित अडचणी येणे, सदर कॅपिग ही तालुका निहाय असावी जेणेकरून अंजनगाव तालुक्यातील अपात्र शिधापत्रिका ऐवजी पात्र लाभार्थींची ऑनलाईन डाटा एन्ट्री करताना अडचण येणार नाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | २९४ | १०० | अंजनगाव सुर्जी तालुक्याकरिता अंत्योदय प्राधान्य कुटुंब योजनेचा शिल्लक इष्टाकाची पूर्तता करण्यात आलेली असणे, इष्टांक अभावी मागील चार महिन्यांपासून एनपीएच शिधापत्रिका वितरित करण्यात येत असून धान्य मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी कार्यालयात अर्ज केलेले असणे, तसेच दिव्यांग लाभार्थी व विधवा महिला यांनी सुद्धा अंत्योदय योजनेचा लाभ मिळण्याकरिता अर्ज केलेले असणे, मयत लाभार्थी वगळणे अपात्र शिधापत्रिका रद्द करणे सायलेंट शिधापत्रिका कमी करणेबाबत कार्यालयीन स्तरावर कारवाई करण्यात येत असणे, तसेच कमी होत असलेल्या जागी नवीन नावे समाविष्ट करण्यात येत असणे, अंजनगाव सुर्जी तालुक्याकरिता अंत्योदय करिता दीडशे कार्ड व प्राधान्य कुटुंब योजने करता दोन हजार प्रति व्यक्ती इष्टाकाची आवश्यकता असणे, सदर वाढीव इष्टाकाची उपलब्ध करण्यात यावी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १९ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई